**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS


● वर्ष २ रे ● अंक ४६ वा ● मंगळवार ०२ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 46 | Date : 02/07/2024 blow Tuesday Page 4 Price 4


## लोकसभेत जोरदार खडाजंग; राहुल गांधींचा सरकारवर जोरदार हल्लाबोल

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**





राष्ट्पतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चेदरम्यान लोकसभेत सोमवारी जोरदार खडाजंगी झाली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुमारे दीड तासाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरकारची धोरणे, भाजप यांच्यावर हल्लाबोल केला. विशेष म्हणजे मोदी यांच्यासह तब्बल नऊ ज्येष्ठ मंत्र्यांनी गांधी यांच्या भाषणादरम्यान हस्तक्षेप केला. गेल्या दहा वर्षांमध्ये प्रथमच संसद सभागृहात विरोधकांच्या शाब्दिक माऱ्यापुढे सत्ताधाऱ्यांनी बचावात्मक पवित्रा घेतल्याचे चित्र यानिमित्ताने दिसले.

राहुल गांधींनी महादेव, प्रेषित मोहम्मद, येशू ख्रिस्त, गुरू नानक अशा विविध धर्मांतील प्रेषित, धर्मगुरू व महापुरुषांची चित्रे असलेले फलक आणले होते. 'या महापुरुषांनी घाबरू नका, दुसऱ्याला भीती दाखवू नका, अशी शिकवण दिली होती. मात्र, भाजप देशभर अल्पसंख्याकांविरोधात हिंसेला प्रोत्साहन देत आहे', असा आरोप करताना भाजपमध्येही भयाचे वातावरण असल्याचा दावा केला. स्वत:ला हिंदू म्हणविणारे भाजपवाले हिंसा आणि द्वेष पसरवित आहेत, ते हिंदू असूच शकत नाहीत असे गांधी म्हणताच पंतप्रधानांनी उभे राहून 'अख्ख्या हिंदू समाजाला हिंसक म्हणून हिणवणे हे अत्यंत गंभीर आहे', असे प्रत्युत्तर दिले. त्यावर 'भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे अख्खा हिंदू समाज नव्हे' असे बिनतोड उत्तर देत गांधी यांनी हा युक्तिवाद तितक्याच ताकदीने खोडून काढला. दुसऱ्यांदा हस्तक्षेप करताना, 'संविधानाने विरोधी पक्ष नेतेपदाचा आदर करण्यास मला शिकवले आहे', असे मोदी म्हणाले.

राहुल गांधींनी आपल्या भाषणात अहिंसा, हिंदू समाज, राम मंदिर-अयोध्या, अग्निवीर, नोटाबंदी, शेतकरी-कृषी कायदे, महागाई, महिलांचे प्रश्न, पेपरफुटी । **पान २ वर**

## भाजपचे विधान परिषदेसाठी पंकजासह ५ उमेदवार जाहीर



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी ५ उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपने पंकजा मुंडे यांना विधान परिषदेसाठी संधी दिली आहे. तसेच भाजपच्या उमेदवारांच्या यादीत सदाभाऊ खोत यांच्याही नावाचा समावेश आहे. योगेश टिळेकर, डॉ. परिणय फुके, अमित गोरखे यांचीही भाजपने विधान परिषदेसाठी उमेदवारी जाहीर केली आहे. राज्यात १२ जुलै रोजी विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी भाजपने आपले ५ उमेदवार जाहीर केले. भाजपच्यावतीने विधान परिषद उमेदवारीसाठी चर्चेत असलेल्या नावांपैकी पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे यांना उमेदवारी मिळाली. मात्र राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांचा पत्ता यामध्ये कट झाला तर रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांना भाजपने विधान परिषदेची उमेदवारी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीचा विचार करून महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, राजकीय आणि प्रादेशिक समीकरणे साधण्याचा प्रयत्न यामध्ये भाजपने केला आहे. भाजपच्या कोट्यातील ५ जागांसाठी जवळपास ११ लोकांची नावे चर्चेत होती. महादेव जानकरांसह माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार नीलय नाईक, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, भाजप नेत्या माधवी नाईक यांचीही नावे विधान परिषदेसाठी चर्चेत होती.

## विधान परिषदेसाठी काँग्रेसकडून प्रज्ञा सातव

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**



महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीसाठी काँग्रेसने आपला उमेदवार जाहीर केला आहे. काँग्रेसने प्रज्ञा राजीट सातव यांना उमेदवारी दिली आहे. प्रज्ञा सातव ह्या काँग्रेसच्या विधान परिषदेतील विद्यमान आमदार आहेत. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये विधानसभेतील आमदार हे उमेदवार निवडून देणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीत विधानसभेतील संख्याबळ हे निर्णायक ठरणार आहे. सद्यस्थितीत विधानसभेमध्ये काँग्रेसचे ३७ आमदार आहेत. त्यामुळे काँग्रेसचा एक आमदार निवडून येऊ शकतो. त्यानंतर काँग्रेसकडे काही मतांचा कोटा शिल्लक राहणार आहे. हा कोटा काँग्रेसकडून मित्रपक्षांकडे वळवला जाऊ शकतो.

## तीन नवे फौजदारी कायदे लागू, दिल्लीत पहिला गुन्हा दाखल

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**




फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर करून ती मंजूर करून घेतली होती. या तीनही कायद्याची अंमलबजावणी १ जुलैपासून करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आजपासून देशभरात नव्या कायद्याची अंमलबजावणी होत असताना आज सकाळी दिल्लीत यानुसार पहिला गुन्हा दाखल करण्यात आला. दिल्लीच्या कमल मार्केट पोलीस ठाण्यात एका फेरीवाल्याच्या विरोधात पहिला गुन्हा दाखल करण्यात । **पान २ वर**

## विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातच पेपर फुटीबाबत कायदा आणणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :** स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने पेपर फुटीसंदर्भात केंद्र सरकारने कायदा केला आहे. राज्यातही अशा प्रकारचा कायदा आणण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. पेपरफुटी व गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी राज्यात कायदा आणणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य बाळासाहेब थोरात यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य राजेश टोपे, आशिष शेलार, भास्कर जाधव, अनिल देशमुख, प्रकाश आबिटकर, रोहित पवार यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, दोन वर्षात एक लाख पदे भरण्याची ऐतिहासिक कामगिरी या शासनाने केली आहे. शासनाने ७५ हजार पदे भरतीची घोषणा केली होती. त्यापैकी ५७ हजार ४५२ जणांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत, तर १९ हजार ८५३ जणांना नियुक्तीचे आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे. ३१ हजार २०१ पदांसाठी भरतीची कार्यवाही सुरु आहे. या पुढील काळात निरंतर भरती प्रक्रिया सुरू राहील. गट 'क' वर्गाच्या जागा टप्प्याटप्प्याने एम.पी.एस.सी.कडे वर्ग करण्यात येणार आहेत. गट 'क' वर्गाच्या रिक्त पदांची भरती । **पान २ वर**

## शिक्षकांच्या जुन्या निवृत्ती वेतनाचा निर्णय तीन महिन्यांत घेणार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज** राज्यातील निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी निघालेल्या जाहिरातीनुसार त्यानंतरच्या कालावधीत सेवेत रुजू झाले असल्यास त्यांनाही जुन्या निवृत्ती ेतन योजनेचा



पर्याय देण्याचा निर्णय पुढील तीन महिन्यांच्या आत घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी

विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली. पवार यांनी विधानसभेत आज निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय मिळण्याबाबतच्या तारांकित प्रश्नाला उत्तर दिले. यासंदर्भात सदस्य संजय केळकर, बाळासाहेब थोरात, आशिष शेलार यांनी प्रश्न-उपप्रश्न विचारले होते. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिराती । **पान २ वर**

## सोलापूर विभागातील एस.टी. कर्मचाऱ्यांना गणवेशाच्या कापडाचे वाटप करण्यास वेळ मिळेना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर विभागातील गणवेश पात्र कर्मचाऱ्यांना गणवेशाचे कापड मागील पाच सहा वर्षापासून मिळाले नव्हते. सेवा शक्ती संघर्ष एस टी कर्मचारी संघाने मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठपुरावा करून एस.टी.च्या सर्व विभागांना गणेश पात्र कर्मचाऱ्यांना गणवेशाचे कापड वाटप करण्यासाठी देण्यात आले असून विभागीय भांडार अधिकारी यांनी विभागातील नऊ ही आगारांना गणवेशाचे कापड वितरित करीत कोणत्या पद्धतीने वितरीत करावयाचे यासाठी दिनांक-०६ जून २०२४ रोजीचे विभागातील सर्व आगार व्यवस्थापकांना क्र.राप/विनिसो/भांडार/ सामान्य/३५८४७ नुसार सूचना दिल्या असतानाही जवळपास एका महिन्याचा कालावधी लोटूनही आज तागायत गणवेशाचे कापड वितरित केलेले नसून कर्मचाऱ्यांचे गणवेश खराब झाल्याने कर्मचाऱ्यांची कुचंबना होत आहे.

गणवेशाचा कपडा विभागीय कार्यालयातून आगारांमध्ये आला असून आगार व्यवस्थापक हे टाळाटाळ करीत आहेत. वरिष्ठांनी लक्ष घालून तात्काळ गणवेशाचे वाटप करावे असे संजय हराळे उपाध्यक्ष सेवा शक्ती संघर्ष एस. टी. कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य.यांनी केले आहे

## ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते निर्मल दिंडीचा शुभारंभ

### स्वच्छ, निर्मल वारीसाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा : गिरीष महाजन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी : आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो भाविक येत असल्याने वारी स्वच्छ, निर्मल व सुरक्षित व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असून निर्मल वारीसाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित निर्मल दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, विभागीय उपायुक्त वर्षा लड्डा, विजय मुळीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन म्हणाले, महाराष्ट्र ही साधुसंतांची भूमी आहे. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी धार्मिक विचारांसोबत स्वच्छतेचा आणि सामाजिक संदेशही दिला. निर्मल वारीच्या निमित्ताने हाच संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

आषाढी वारीसाठी राज्यभरातून पालखी सोहळ्यांचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. शासनाने वारकऱ्यांच्या व्यवस्थेसाठी पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. निर्मल वारीसाठी मागील वर्षीपेक्षा अधिक निधी उपलब्ध करुन दिला आहे. पालखी मार्गावरील गावांना त्रास होऊ नये, रोगराई पसरू नये यासाठी शासन योग्य ती काळजी घेत असून निर्मल वारीसाठी जिल्ह्यातील स्वयंसेवक, सेवाभावी संस्था, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. संतांनी भजन, कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचा, सामाजिक समतेचा संदेश दिला. पालखी मुक्काम व विसावा गावातून प्रस्थान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी गाव व परिसराची स्वच्छता करण्याची खबरदारी घ्या. स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीचा संदेश दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वांनी पालखी मार्गावर वृक्षलागवडीचा संकल्प करावा, असे आवाहनही श्री.महाजन यांनी केले.। **पान २ वर**

## उत्पन्नाचा दाखला कढण्यासाठी महिलांची गर्दी..



सोलापूर : राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारे रहिवासी दाखला आणि उत्पन्न दाखला काढण्यासाठी महिलांनी जुने सेतू कार्यालयात असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रचंड गर्दी केली होती.



लाडकी बहीण या योजनेसाठी अक्कलकोट येथे आज तलाठी कार्यालय व सेतू सुविधा केंद्रात लोकांची प्रचंड गर्दी झाली आहे एक जुलैपासून अर्ज भरणे सुरू झाले आहे असे समजल्यावर लोकांचे अक्कलकोट मध्ये प्रत्येक तलाठी कार्यालय मध्ये उत्पन्न दाखला घेण्यासाठी प्रचंड गर्दी निर्माण झाली व तसेच सर्व महा-ई-सेवा केंद्र मध्ये सुद्धा लोकांनी रहिवासी व उत्पन्न काढण्यासाठी धावपळ करत आहेत अजून अर्ज भरण्याच्या प ओपन सुद्धा झाली नव्हती तरी लोकांची एवढं गर्दी झाली होती

# संपादकीय

## बळकट करावी लागणार आहे...

नुकताच रशिया आणि उत्तर कोरिया यांनी संरक्षण करार केला. दोघांपैकी कोणावरही हल्ला झाला तर दोघांवर तो हल्ला झाल्याचे मानले जाईल, असे या कराराचे सार आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युध्द सुरू आहे. पश्चिमेकडील देशांकडून युक्रेनला सातत्याने मदत केली जात आहे. त्याला उत्तर म्हणून रशियाने उत्तर कोरियासोबत हा करार केला आहे. तथापि, या करारामुळे चीनचे टेन्शन वाढले असल्याचे चित्र निर्माण करण्याचा फसवा प्रयत्नही केला जात आहे. चीनच्या तणावामागची कारणेही सांगितली गेली. ती म्हणजे चीनला नव्या जागतिक रचनेत जी भूमिका वठवायची आहे त्यात हा करार त्यांना जाचदायक ठरू शकतो. आपल्या फायद्यासाठी आताची घाई पोषक नसल्याचे चीनचे मानणे आहे. प्रत्यक्ष काहीही दिसत असले तरी चीन, रशिया आणि उत्तर कोरिया ही नवी आघाडी आकाराला आलीच आहे अन् ती जगासाठी अत्यंत धोकादायक आणि कदाचित तिसऱ्या महायुध्दाच्या दरीकडे ढकलणारी आहे. चीनला जगाचे नेतृत्व करण्याची इच्छा आहे. त्याला अमेरिकेची मक्तेदारी मोडून काढायची आहे. त्यामुळे आपल्या प्रत्यक्ष स्वरूपाच्या अगदी विपरीत स्वत:ची एक शांतताप्रिय देश अशी प्रतिमा करण्याचा चीनचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेमुळे जगात गटबाजी निर्माण झाली असल्याचा चीनचा दावा आहे. ही गटबाजी शीतयुध्दाकडे घेऊन जाणारी असल्याचेही त्या देशाचे म्हणणे आहे. असे असतानाच रशिया आणि उत्तर कोरिया जे चीनच्या जवळचे देश मानले जातात त्यांच्यात झालेला करार चीनला काहीसा अडचणीत टाकणारा आहे. कारण जे आरोप चीन आजपर्यंत अमेरिकेवर करत होता तेच काम त्याच्या भागीदार देशांनी केले आहे. त्यामुळे अमेरिकेचा आणि चीनचा गट अशी विभागणी होणे अपरिहार्य आहे. करार जरी दोन देशांत झाला असला तरी त्यात चीनच्या सहभागाचा म्हणजे त्रिपक्षीय कराराचा त्याला वास येत आहे. तथापि, चीनला आताच हे मान्य करायचे नाही. अमेरिकेतील माध्यमांनीही त्याकडेच इशारा केला आहे. तूर्त चीनला काही बाबी हव्या असल्या तरी त्यातील सहभाग भासवायचा नसून त्यांना आपले पर्याय खुले ठेवायचे आहेत. रशिया आणि उत्तर कोरियाच्या संरक्षण कराराचे व्यापक परिणाम होणार आहेत. सगळ्यात पहिले त्याची दखल घ्यावी लागणारे देश म्हणजे जपान आणि दक्षिण कोरिया. अमेरिकेचे हे पारंपरिक मित्र देश असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेची खबरदारी घेत अमेरिकेला आपली सुरक्षा सज्जता आणखी बळकट करावी लागणार आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १५ जुलैपर्यंत करता येणार अर्ज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूर : राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली असून जास्तीत जास्त पात्र महिलांनी या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले आहे. १ जुलैपासून या योजनेला सुरुवात झाली असून १५ जुलैपर्यंत अर्ज संकलित करण्यात येणार आहेत. सर्वांनी सर्वोच्च प्राधान्य देत हे काम पूर्णत्वास न्यावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.



या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायत पातळीपर्यंत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन दिला जात आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या व ६० वर्षे ज्यांची पूर्ण झाली नाहीत अशा वयोगटातील महिलांनी हे अर्ज अंगणवाडी सेविकांकडे जमा करावयाची आहेत. तालुका पातळीवरील महिलांनी हे अर्ज नगर परिषद/नगर पंचायत येथे तर महानगरपालिका क्षेत्रात हे अर्ज प्रभाग कार्यालयात जमा करावयाची आहेत. याबाबत संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य ते निर्देश दिले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्पष्ट केले.

महिलांचा श्रम सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे.

बैठकीला जिल्हा महिला व बालविकास उपायुक्त अपर्णा कोल्हे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी भारती मानकर यांच्यासह संबंधित स्थानिक अधिकारी प्रत्यक्ष तर तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

**अपात्रता :** (१) ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. (२) ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे. (३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/ उपक्रम/ मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी अपात्र ठरणार नाहीत ४) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे ( रु.१,५००/- पेक्षा जास्त लाभ घेतला असेल. (५) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे. (६) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किवा राज्य सरकारच्या बोर्ड/ कॉपोरशन/बोर्ड/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत. (७) ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे. (८) ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

**योजनेचा उद्देश :** १) राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे. २) त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. ३) राज्यातील महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, ४) राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना मिळणे. ५) महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा.

**पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये मिळणार**

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (ऊळीशलीं इशपशषळीं ढीरपी-षशी) सक्षम बँक खात्यात दरमहा रु.१,५००/- इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल.

**लाभार्थ्यांची पात्रता** १) लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे. २) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला, ३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत. ४) सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. ५) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

**ही आहेत आवश्यक कागदपत्रे**

(१) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज. (२) लाभार्थ्यांचे आधार कार्ड. (३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य). (५) बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. (६) पासपोर्ट आकाराचा फोटो. (७) रेशनकार्ड. (८) सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

पान १ वरुन

## ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन ..

ते म्हणाले, उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर व त्र्यंबकेश्र्वरसह राज्यातील पाच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भक्तांना सर्व सुविधा उपलब्ध होण्यासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे. राज्यातील ४९७ 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी आवश्यक सुविधांसाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, वारीच्या माध्यमातून सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा दरवर्षी पहायला मिळतो. राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविक आषाढी वारीसाठी येत असतात. संपूर्ण सोहळा स्वच्छ, निर्मल व सुरक्षित व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याकरिता पुरेसा निधीही उपलब्ध करुन दिला आहे. विविध संतांनी समाजप्रबोधन करताना धार्मिक कार्याला सामाजिक कार्याची जोड कशी द्यावी याबाबत संदेश दिला. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामुहिक स्वच्छतेबाबत संदेश दिला. मंदिर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवा, कचरा अस्ताव्यस्त फेकू नका, प्लास्टिकचा वापर टाळा, नदी प्रदूषण टाळा असे सांगून स्वच्छ, निर्मल वारीसाठी स्वच्छतेच्या सुविधांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पाटील म्हणाले, महाराष्ट्राचा मानबिंदू असलेली आषाढी वारी महाराष्ट्राचे वैभव म्हणून ओळखली जाते. संतांनी समाजाची मने निर्मल केली. त्यांच्या कार्याच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व समाजाला सांगितले. संतांचा संदेश समोर ठेवून निर्मल वारीची सुरूवात करण्यात आली आहे. निर्मल वारीसाठी मागील वर्षीपेक्षा भौतिक सुविधा वाढविण्यात आल्या आहेत. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्तव्याला सामाजिक जबाबदारीची जोड देत निर्मलवारी यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी निर्मल दिंडीसाठी दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. तसेच प्रातिनिधीक स्वरुपात दोन दिंडी प्रमुखांना औषधोपचार कीटचे वितरण करण्यात आले.

## विधिमंडळाच्या पावसाळी ..

यापुढे एम.पी.एस.सी मार्फत करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत राजपत्रित पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. फेर परीक्षा घेण्याबाबत व या परीक्षेशी संबंधित गैरप्रकार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मृद व जलसंधारण विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सदर परीक्षा टीसीएस आणि आयबीपीएसतर्फे होतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात बऱ्याच ठिकाणी वेळोवेळी मोठी प्रदर्शने भरविण्यात येतात. तसेच काही शहरांमध्ये 'गेम झोन' आहेत. या ठिकाणी स्थानिक प्रशासनाची परवानगी आवश्यक असते. त्यामध्ये वीज पुरवठ्याबाबत परवानगीचाही समावेश असतो. प्रदर्शनांची ठिकाणे, गेम झोन आदी ठिकाणी वीज पुरवठ्याबाबत असलेल्या व्यवस्थेची महावितरणमार्फत तपासणी करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

कात्रज (जि. पुणे) येथे फोरेन सिटी प्रदर्शनात आयोजनातील त्रुटीमुळे एका मुलाचा विजेच्या धक्क्याने झालेल्या मृत्यूबाबत सदस्य राहुल कूल यांनी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य आशिष जयस्वाल, योगेश सागर, प्राजक्त तनपुरे यांनीही सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, प्रदर्शने, गेम झोन यामध्ये वीज पुरवठ्याबाबत यापूर्वी दिलेल्या परवानगीची, तेथील वीज पुरवठ्याची तपासणी करण्यात येणार आहे. कुठेही कात्रजच्या घटनेप्रमाणे अपघात होऊ नये, याची काळजी घेण्यात येईल. विद्युत पुरवठ्याबाबत यंत्रणेतील असलेल्या दोषांबाबत, वारंवार नागरिकांना येणाऱ्या समस्यांबाबत मागील काळात मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेच्या यशापयशासंदर्भातील अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल. उपलब्ध मनुष्यबळावर महावितरण काम करीत आहे. यासोबत मनुष्यबळ उपलब्धतेसाठी कंत्राटी व्यवस्थाही उभारण्यात आलेल्या आहेत. महावितरणला अधिकचा महसूल असलेल्या ठिकाणी इतर ठिकाणांपेक्षा पर्याप्त मनुष्यबळ देण्याविषयी तपासून कार्यवाही करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

नागपूर शहरात छोटी - छोटी हॉटेल्स सुरू झाली आहेत. काही ठिकाणी पाच - सहा खोल्यांचे मिळून हॉटेल चालविली जात आहेत. अशा हॉटेलचा सर्रास व्यवसाय सुरू झालेला आहे. या छोट्या हॉटेलची संपूर्ण तपासणी करून येथील व्यवसायांची चौकशी करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात येणार आहेत, असे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य विकास ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पोलिसांनी अशा हॉटेलना भेटी देण्याची दिनदर्शिका तयार करावी. त्यानुसार नियमित भेटी देऊन अशा छोट्या-छोट्या हॉटेलची तपासणी करावी. या ठिकाणी अवैध काम सुरू नसल्याची खात्री पोलिसांनी करावी.

## लोकसभेत जोरदार खडाजंग..

अशा असंख्य मुद्द्यांवरून राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकार, मोदी-शहा आणि भाजपच्या धोरणांचे वाभाडे काढले. भाषणामध्ये भाजपच्या सदस्यांनीच नव्हे, तर वरिष्ठ मंत्र्यांनीही अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्ष सदस्यांच्या भाषणावेळी अमित शहा वा राजनाथ सिंह यांच्यासारखे ज्येष्ठ मंत्री क्वचितच हस्तक्षेप करतात. या वेळी मात्र गांधींचे आरोप तात्काळ खोडून काढण्याची स्पर्धाच केंद्रीय मंत्र्यांमध्ये लागल्याचे चित्र होते! केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तीन-चार वेळा आक्षेप घेत लोकसभाध्यक्ष ओम बिर्लांना, 'राहुल गांधी खोटे बोलत असून त्यांना अडवले जावे', अशी विनंती केली. हिंदूंवरील टिप्पणीबद्दल राहुल गांधींनी माफी मागावी, अशी मागणीही त्यांनी केली. भाजप भय निर्माण करत असल्याच्या आरोपावर '१९८४ च्या दंगलीत शिखांची कत्तल करण्यात आली. काँग्रेसला दहशत आणि भयाबद्दल बोलण्याचा कोणताही अधिकार नाही', असे प्रत्युत्तर शहा यांनी दिले. गांधींनी 'अग्निवीर'चा मुद्दा उपस्थित केल्यानंतर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दोन वेळा हस्तक्षेप केला. त्याबरोबरच भूपेंद्र यादव, शिवराजसिंह चौहान, पीयूष गोयल, किरेन रिजिजू, प्रल्हाद जोशी, अर्जुनराम मेघवाल, गजेंद्रसिंह शेखावत अशी मंत्र्यांची फौज सातत्याने हस्तक्षेप करून गांधींचे म्हणणे खोडून काढण्याचा प्रयत्न करत होती. गांधींनी सभागृहात अनेक खोटे आरोप केले असून त्यांनी पुरावे द्यावेत अन्यथा सभागृहाची माफी मागावी, अशी मागणीही शहांनी लोकसभाध्यक्षांकडे केली.

## शिक्षकांच्या जुन्या निवृत्ती ..

निघालेल्या व त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय शासनाद्वारे नुकताच घेण्यात आला आहे. या निर्णयामध्ये केवळ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक पर्याय निवडण्याचा विकल्प देण्यात आला आहे. निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यांच्याबाबतीत हा निर्णय लागू करण्यात आला नसल्याची माहितीही पवार यांनी दिली.

## तीन नवे फौजदारी कायदे लागू..

आला आहे.केंद्र सरकारने ब्रिटिशकालीन भारतीय दंड संहिता (खझउ) (१८६०), फौजदारी प्रक्रिया संहिता (उीझउ) (१८८२) व भारतीय पुरावा कायदा (१८७२) हे कायदे रद्दबातल ठरवून त्याजागी नवे तीन कायदे लागू केले होते. आज सकाळी दिल्लीतील फेरीवाल्याविरोधात भारतीय न्याय संहिता कायद्यातील कलम २८५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. नवी दिल्ली रेल्वे स्थानकाच्या बाहेरील रस्त्यावर अडथळा निर्माण करण्याच्या कारणावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर फेरीवाल्याने रस्त्यात गुटखा आणि पाण्याच्या बाटल्या विकण्याचा स्टॉल लावला होता. त्याच्या स्टॉलमुळे प्रवाशांना चालण्यास अडथळा निर्माण होत होता. सदर स्टॉल हटविण्यात यावा, अशी ताकीद दिल्यानंतरही स्टॉल हटविला न गेल्यामुळे पोलिसांनी अखेर गुन्हा दाखल केला. एनडीटीव्हीने दिलेल्या बातमीनुसार, पोलिसांनी एफआयआरमध्ये सदर फेरीवाला गुटखा, बीडी, सिगारेट विकत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेला व्यक्ती पाटणा, बिहारचा असल्याचे सांगितले जाते. आजपासून तीन नवे कायदे लागू होत असताना दिल्लीतील अनेक पोलीस ठाण्याबाहेर तसेच सार्वजनिक ठिकाणी नव्या कायद्याची माहिती देणारे पत्रक लावण्यात आले आहेत. लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. नव्या कायद्यातील तरतुदी आणि त्यानुसार काय शिक्षा असेल, याची माहिती या पत्रकात देण्यात आली आहे.

# पशुवैद्यकीय दवाखाना टाकळी श्रेणी २ ला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची सदिच्छा भेट.




पत्रकार नामदेव निर्मळे

सैनिक टाकळी तालुका शिरोळ येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ ला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रमोद बाबर यांनी सदिच्छा भेट दिली. टाकळी टाकळीवाडी क्षेत्रातील कामाचा आढावा घेतला. कार्यक्षेत्रामधील पूर परिस्थिती संदर्भाची माहिती घेऊन पशुधनासाठी श्री संभाजी तुकाराम पाटील व इतर पशुपालकांना वैरण बियाणाचे वाटप केले तसेच डॉ. विष्णू निर्मळे यांचे कामकाजाबद्दल अभिनंदन करण्यात आले.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सोलापुरात सर्वात स्वस्त वैद्यकीय उपचार मिळतात : डॉ.शिरीष कुमठेकर



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : डॉक्टरी पेशा हा पवित्र पेशा मानला जातो. त्याला आता वैद्यकीय व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी सोलापुरातील काही डॉक्टर्स व रुग्णालये पुणे व मुंबईच्या तुलनेत दर्जेदार व उत्तम वैद्यकीय सेवा सोलापुरात स्वस्त दरात देत आहेत. त्यामुळेच सोलापूर हे वैद्यकीय व्यवसायाचे आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रातले सीमेवरचे मुख्य केंद्र झाले आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शल्य चिकित्सक व कर्करोग तज्ञ डॉ. शिरीष कुमठेकर यांनी केले.

ते राष्ट्रीय डॉक्टर्स दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहरातील वैद्यकीय क्षेत्रात विविध शाखांमध्ये उत्कृष्ट सेवा देत असलेल्या डॉक्टरांचा सत्कार समारंभा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळचे अध्यक्ष व स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी वळसंगचे चेअरमन राजशेखर शिवदारे हे होते. हा कार्यक्रम जुळे सोलापूर येथील डी. एस. टी. एस. मंडळ कॉलेज ऑफ फार्मसीच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेला होता.यावेळी मंच्यावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, शिवदारे कॉलेजचे विश्र्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. वाय.पाटील, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, युवा प्रतिनिधी ऐश्र्वर्या सावंत आदी होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बिधनचंद्र रॉय व वी. जी. शिवदारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

डॉ. शिरीष कुमठेकर व राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रतज्ञ डॉ. किरण सारडा, कान, नाक, घसातज्ञ डॉ. जलील मुजावर, मधुमेह तज्ञ डॉ. भास्कर पाटील, त्वचारोग तज्ञ डॉ. तृप्ती खटावकर, पोटविकार तज्ञ डॉ. प्रविण पाटील यांना सन्मानपत्र, सन्मान चिन्ह, शाल व बुके देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व सत्कारमूर्तींनी सत्काराला उत्तर देताना आपल्या रुग्णांकडून असलेल्या अपेक्षा व आपण करीत असलेले काम याबद्दलचे मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षिय समारोप करताना राजशेखर शिवदारे यांनी फार्मासिस्ट, संशोधक व डॉक्टर्स एकत्र आल्यास व त्यांच्यात समन्वय असल्यास नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवा देता येतात.प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास कविवर्य मारुती कटकधोंड, जुळे सोलापूर म.सा.पचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, डॉ. किरण पाटणकर, डी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जी. के. कापसे, प्रा. विजया राजोपाध्ये, विविध क्षेत्रातील प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्वेरीच्या संशोधन विभागाची गरुड झेप

## डॉ.बी.पी.रोंगे, डॉ.प्रशांत पवार व प्रा.बी.डी. गायकवाड यांच्या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाअंतर्गत असलेल्या वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांच्या पेटेंटला भारत सरकारकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे.

'अॅप्रटस फॉर मेजरिंग एलोंगेनेशन ऑफ कन्वेर चेन अँड लाईफ इस्टीमेशन देअर ऑफ' या विषयावर प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांनी या शोध पेटंटची निर्मिती केली आहे. साखर कारखान्यातील अवजड मशीन्समध्ये असलेल्या कन्वेअर चेकच्या टेस्टिंग साठी याचा उपयोग होतो. डॉ. बी.पी. रोंगे, डॉ. प्रशांत पवार व प्रा.बी.डी. गायकवाड यांच्या या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता मिळाल्याबद्धल वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवर, अधिष्ठाता, विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

संशोधन विभागाच्या प्रगतीचे द्योतक असणाऱ्या या पेटंट मुळे संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांचे अभिनंदन केले.

# सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया मदत केंद्राची सुरुवात



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया मदत केंद्राची सुरुवात करण्यात आल्याचे माहिती महाराष्ट्र राज्य प्रवक्ता रविराज पोटे, यांनी केले विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी अनेक अडचणी येत असतात विद्यार्थी आणि पालकावरील ताण कमी करण्यासाठी व त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी,सी,बी खेडगी महाविद्यालय अक्कलकोट येथे गेल्या ६ वर्षापासून सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया मदत केंद्राचे आयोजन करण्यात येते आणि या वर्षी सुद्धा मदत केंद्राची सुरुवात करण्यात आली

अनेक विद्यार्थ्यांना ऍडमिशन साठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यात आले सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे, रोहित उघडे, गंगाराम वाघमारे, साहिल कांबळे, अनिल गायकवाड, सम्राट सोनकांबळे, मस्के, आदी सह विद्यार्थी उपस्थित होते

# नितीन काळे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः समाजसेवक नितीन काळे यांना पुणे येथील टॅलेंट कट्टा महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. काळे हे अनेक वर्षांपासून समाजसेवेचे काम करीत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन आलेले काळे हे आज उंच शिखरावर पोहचताना दिसत आहेत. प्रत्येकाच्या अडचणीला व मदतीला धावुन जाणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून काळे यांची सोलापूर जिल्ह्यात ओळख आहे. काळे यांचा जनसंपर्क देखील मोठ्या प्रमाणात असुन गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी असो अथवा शासकीय कार्यालयातील अनेक कामे असो अधिकारी वर्ग यांना धारेवर धरून आक्रमक भूमिका घेऊन सामान्य जनतेची कामे मार्गी लावतात .काळे यांचे वय पाहता अवघे २४ वर्ष पुर्ण झाली



आहेत पण कार्य करताना वयाचा विचार न करता जीवनात अनेक अडचणींवर मात करून यशाचे रहस्य फक्त आणि फक्त कठोर परिश्रम करत राहायचे सामान्य माणसाला कायम मदतीची भुमिका घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जीवाचे रान करेल पण त्यांना न्याय मिळवून देईल असे नितीन काळे यांनी बोलताना सांगितले. याच सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना तब्बल २५ पुरस्काराने अनेक संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे.

काळे यांना कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतःच्या कर्तुत्वावर काळे यांनी राजकीय सामाजिक क्षेत्रात देखील मोठे नाव केले आहे याच कार्याचे कौतुक अनेक वेळा लोकप्रतिनिधी आमदार खासदार मंत्री महोदयांनी पत्र पाठवुन प्रत्यक्षात भेटुन केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. पंढरपूरात काळे यांना जनसामान्यांचे नेतृत्व प्रत्येकाच्या अडचणीला धावुन जाणारे नेतृत्व म्हणून ओळख आहे. संघटन कौशल्य देखील काळेंकडे असल्याने त्यांना भारतीय जनता पक्षाने अनेक वेगवेगळ्या पदांवर राज्यावर काम करण्याची संधी दिली सध्या ते युवा मोर्चा प्रदेश सचिव म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत ते भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे विश्र्वासू म्हणून ओळखले जातात. म्हणुनच त्यांना टॅलेंट कट्टा महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने इंडियन टॅलेंट नॅशनल अवॉर्ड २०२४ समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ दिपक जाधव यांनी जाहीर केला होता. काळे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच क्षेत्रातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुणे येथे स्विकारण्यासाठी पंढरपुर हुन अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्योजक राजाभाऊ खोबरे, शिवाजी घाडगे, नागेश बुधवंत उपस्थित होते.

# धरित्री विद्यालय मध्ये वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : १ जुलै २०२४ रोजी धरित्री विद्यालयात आपल घरआलीयाबबाद नळदुर्ग ता.तुळजपू येथे हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची १११ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांच्या भाषण स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आली.सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी सर यांच्या हस्ते हरितक्रांती चे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी इतिहासाचे रंग रूप हे स्वागत गीत सादर केले .यानंतर इयत्ता पाचवी ते सातवी या गटातून १० विद्यार्थिनी व इयत्ता आठवी ते दहावी या गटातील ०८ विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर आपले मनोगत भाषणाच्या स्वरूपात व्यक्त केले. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी लिहिलेल्या *संत सूर्य*गावकरी ,धाराशिव नामा ,संघर्ष , सोलापूर भूषण या वर्तमानपत्रातील वसंतराव नाईक यांच्या *जीवनपटावरील लेखाचे वाचन इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी श्रुती भुमकर हिने केले. यानंतर सुनील पुजारी यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवनपटातील महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .प्रत्येक गटातून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले .लहान गटातून *प्रथम क्रमांक करण पिस्के, द्वितीय क्रमांक स्वरा कांबळे व तृतीय क्रमांक आरुषी राठोड या विद्यार्थ्यांचा आला तर मोठ्या गटातून प्रथम क्रमांक ज्ञानेश्र्वरी पवार द्वितीय क्रमांक नागिणी हुल्ले व तृतीय क्रमांक वैष्णवी पिस्के व संस्कृती कदम या विद्यार्थिनींचा आला.परीक्षक म्हणून होळे युवराज यांनी काम पाहिले. भाषण स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांच्या हस्ते पुष्प देऊन करण्यात आला. तसेच याप्रसंगी दयानंद महाविद्यालय लातूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शास्त्रज्ञांच्या जीवनपटावरील निबंध स्पर्धेत प्रथम ३ क्रमांक



मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या स्पर्धेत *प्रथम क्रमांक मिळवलेल्या वैष्णवी तुळशीराम पवार हिचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांच्या हस्ते गोल्ड मेडल सर्टिफिकेट व पुष्प देऊन करण्यात आला .

द्वितीय क्रमांक मिळवलेल्या प्रगती उत्तम वाघमारे तिचा सत्कार सिल्वर मेडल ,सर्टिफिकेट व पुष्प देऊन शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी केला तृतीय क्रमांक मिळवलेल्या अयोध्या हरिलाल करदुरे हिला ब्रांझ पदक, सर्टिफिकेट व पुष्प देऊन सुनील पुजारी यांच्या हस्ते गौरवण्यात आले.भाषण स्पर्धेनंतर दुपारच्या सत्रात निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध स्पर्धेची जबाबदारी होळे युवराज यांनी पार पाडली. यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावीतील २६ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सातलगावकर अणणाप्पा * यांनी केले. कार्यक्रमाचे *आभार रमेश चव्हाण यांनी मानले.कार्यक्रमासाठी परिश्रम जगदेवी शंकरशेट्टी ,विठ्ठल पाटील कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## सर्वांगीण विकास हेच विद्यार्थ्यांचे ध्येय असले पाहिजे.

# विनोद मोहतूरे यांचे प्रतिपादन : प्रवेशोत्सव, वृक्षारोपण साजरा व शैक्षणिक साहित्य वाटप

**गोदिंया/दैनिक यशसिध्दि न्यूज**

विद्यार्थी हा जिवनाच्या सागरात पोहणारा हा राजहंस आहे. विद्यार्थी हा भविष्याचा उत्तम नागरिक आहे. विद्यार्थी यांनी गैरबाबींचा किंवा अन्य कोणत्याही गोष्टांचा उपयोग करु नये. तसेच विद्यार्थी यांनी स्वतः आवडीने तयार होऊन स्वतःचा सर्वांगीण विकास




केले पाहिजे. असे प्रतिपादन समाज कल्याण गोदिंयाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतूरे यांनी केले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी मंचावर विनोद मोहतूरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, प्रभारी गृहपाल प्रदिप ढवळे, नीता भलमे साधना पारधी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे दुपारी ०१.०० वाजता साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या परिसरात सहाय्यक आयुक्त यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नंतर प्रवेशोत्सव सेल्फी स्टन्डवर छायाचित्र काढण्यात आले. व विद्यार्थीनी फोटो काढून आम्ही शाळेत प्रवेश केला हे सिध्द केले आहे. तसेच यावेळी उपस्थित सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विनोद मोहतूरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका अस्मिता तेलंग यांनी तर प्रस्ताविक रविशंकर इठूले यांनी केले आभार प्रदीप ढवळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी मुन्नाभाई नंदागवळी, तुषार महाजन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, बाह्य स्त्रोत कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# संत वीरशैव कक्कय्या समाजाचे राज्यव्यापी धरणे आंदोलन मुंबईत संपन्न !

## कोण म्हणतं देणार नाही, घेतल्या शिवाय राहत नाही :आझाद मैदानावर जोरदार घोषणाबाजी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबइ/अमोल धडके: संत वीरशैव कक्कय्या समाजासाठी शासकीय आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे.या मागणीसाठी शुक्रवार दि २८ जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संत वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्यातील ढोर समाजाच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाला संपूर्ण राज्यातील जिल्हा व तालुक्यातून कानाकोपऱ्यातून ढोर समाज बांधव मोठ्या हजारोच्या संख्येने या आंदोलनास उपस्थित होते.यावेळी राज्यभरातून आलेल्या आंदोलकांनी राज्य सरकारच्या विरोधात कोण म्हणतं देणार नाही घेतल्या शिवाय राहत नाही, संत कक्कय्या महाराज की जय,ढोर समाजाचा विजय असो,या जोरदार घोषणानी आझाद मैदान दणाणून गेला.आणि या राज्य सरकारास आंदोलनाच्या माध्यमातून वेठीस धरण्यात आले. याचबरोबर समाजातील विविध भागातून आलेल्या ढोर समाज बांधवांनी स्वतंत्र शासकीय आर्थिक विकास महामंडळ जो पर्यंत संत कक्कय्या समाजास शासन देणार नाही तोपर्यंत हा लढा असाच सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.आंदोलनात महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. भर पावसातही संत कक्कय्या समाजातील बांधव एकजूट होऊन आंदोलन स्थळी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी घेतली आंदोलनाची दखल

संत कक्कय्या समाजाने आर्थिक विकास महामंडळासाठी पुकारलेल्या राजव्यापी आंदोलनास आमदार गणेश नाईक व माजी आमदार बाबुराव माने यांनी भेट घेऊन आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.



तसेच अनुसूचित यादीमधील अनुक्रम १८ नुसार ढोर , डोहोर, कंकय्या आणि कक्कय्या जातीसाठी स्वतंत्र शासकीय आर्थिक विकास महामंडळ ,शासनाने स्थापन करावे ह्या प्रमुख मागणीसहित इतर मागण्यांबाबत विविध गाव,तालुका,जिल्हा येथील सहभागी झालेल्या सर्व बांधवांचा प्रचंड समुदाय आणि त्याचा आक्रोश पाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आंदोलनाची दखल घेतली.

दरम्यान वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळाचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी विधान भवन दालनात गेले. या शिष्टमंडळात वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ मुंबई अध्यक्ष महादेव शिंदे, सचिव यशवंत नारायणकर, प्रवक्ते यशवंत शिंदे, सहसचिव सूर्यकांत इंगळे,वीरशैव कक्कय्या समाज मंडळ पुणे अध्यक्ष हनुमंत सोनवणे,समस्त कक्कय्या महासंघ मुंबई निवृत्ती सावळकर ,कक्कय्या समाज संभाजीनगर अध्यक्ष राजकुमार सोनावणे, कक्कय्या समाज पदाधिकारी संभाजीनगर सोनोपंत कावळे, कक्कय्या समाज पदाधिकारी संभाजीनगर दिग्विजय शेरखाने, बहुद्देशीय ढोर समाज डोंबिवली मंडळ अध्यक्ष अशोक कटके,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सचिव गोविंद खरटमल, पत्रकार दत्ता खंदारे,पत्रकार अमोल धडके,पत्रकार गणपत शिंदे,हेमंत शेरखाने,सुनील शिंदे म्हसवड,गणेश नारायणकर कोल्हापूर,काँग्रेस राज्य सदस्य प्रतीक्षा ताई सोनवणे,विश्र्वनाथ सोनवणे मिरज,दीपक सावळकर,यांचा सहभाग होता. आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घडवून सांगितले की संत वीरशैव कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ शासनाने स्थापन करावे व ढोर समाजाचे इतर मागण्या मान्य कराव्यात अशी व्यथा समाजाच्या वतीने आमदार यांनी केले.यावेळी मुख्यमंत्र्यांनी शांतपणे सर्व गोष्टी ऐकून घेतले. तसेच माझ्या वतीने शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नेमणूक करत आहे.ते तुमचे समस्या जाणून घेतील.आणि मला सांगतील यावेळी दीपक केसरकर यांनी भेट झाली त्यांना कक्कय्या मागण्याबाबत ४ पानी निवेदन देण्यात आले.

तुमच्या मागण्याबाबत या अधिवेशन मध्ये १० जुलै २०२४ रोजी आर्थिक नियोजन समितीची बैठक असणार असून त्यामध्ये हा विषय घेऊन वरच्या सभागृहात मंजूर करून अधिवेशनाच्या अतीम दिवशी १२ जुलै २०२४ रोजी याबाबतची घोषणा केली जाईल.असे आश्र्वासन केसरकर यांनी दिले.

# शासकीय योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी

## माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'संवादवारी' उपक्रमाचे आयोजन



**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शासकीय योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आषाढीवारी कालावधीत आळंदी ते पंढरपूर व देहू ते पंढरपूर या दोन पालखी मार्गावर राज्य शासनाचा चित्ररथ, एलईडी मोबाईल व्हॅन, प्रदर्शन संच, मोबाईल व्हॅनसह लोककला पथक, पथनाट्याच्या माध्यमातून 'संवादवारी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'संवादवारी' हा उपक्रम २ ते १९ जुलै २०२४ या कालावधीत होणार आहे. संत ज्ञानेश्र्वर पालखी सोहळ्यात पुणे विभागातील सासवड येथे २ जुलै रोजी पालखीतळ, वाल्हे येथे ४ रोजी जिल्हा परिषद शाळा क्र. १ व २, लोणंद येथे ६ रोजी पालखीतळ, फलटण येथे ८ रोजी पालखीतळ, बरड येथे १० रोजी नगरपरिषद आवार, नातेपुते येथे ११ रोजी पालखीतळ, माळशिरस येथे १२ रोजी कृषी विभाग मैदान, भंडी शेगाव येथे १४ रोजी ग्रामपंचायत शॉपींग सेंटरसमोर, वाखरी येथे १५ रोजी ग्रामपंचायत आवार व पंढरपूर येथे आषाढी यात्रेदरम्यान शासनाच्या योजनांवर आधारित प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान कदमवाक वस्ती येथे २ जुलै रोजी पालखीतळ, यवत येथे ३ रोजी जिल्हा परिषद शाळा क्र.१ व २, वरवंड येथे ४ रोजी, उंडवडी गवळ्याची येथे ५ रोजी पालखी तळ, बारामती येथे ६ रोजी नगरपरिषद, आंथुर्णे येथे ८ रोजी, इंदापूर येथे १० रोजी पंचायत समिती आवार, अकलूज येथे ११ व १२ रोजी पंचायत समिती आवार, पिराची करोली येथे १३ रोजी पालखीतळ, वाखरी येथे १४ व १५ रोजी पालखी मार्गासमोरील मोकळ्या जागेत व पंढरपूर येथे आषाढीवारी दरम्यान संवादवारी आयोजित करण्यात येणार आहे.

तरी अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे करण्यात आले आहे.

# निवासी नायब तहसीलदार डॉ.आस्मा मुजावर रुजू होताच कामाची धडाकेबाज सुरूवात

तीन दिवसात काढले सहाशे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना दिलासा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : सिंदखेडराजा तहसील कार्यालयात कुणी अधिकारी यायला तयार नाही अशी परिस्थिती असताना शासनाने डॉ आस्मा मुजावर यांची देऊळगाव राजावरून सिंदखेड राजा येथे निवासी नायब तहसीलदार म्हणून बदली केली त्यामुळे या तहसील कार्यालयाला अनेक दिवसापासून रिक्त असलेले निवासी नायब तहसीलदार पद कायमस्वरूपी मिळाले या पदावर डॉ आस्मा मुजावर रुजू होतात त्यांनी आपल्या कामकाजाला धडाकेबाज सुरुवात करत तीन दिवसांमध्ये तब्बल ६०० प्रमाणपत्र निकाली काढले त्यामुळे विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुर्दैवाने सिंदखेडराजा तहसील कार्यालयात



अधिकारी येण्यास तयार नसल्याने अव्वल कारकून असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रभार देऊन तहसीलचे काम करून घ्यावे लागले अवल कारकुणाला पूर्ण अधिकार नसल्याने अनेक कामांना अडचण निर्माण व्हायची त्यामुळे या ठिकाणी कायमस्वरूपी नायब तहसीलदार द्यावी अशी मागणी मोठ्या प्रमाणात होत होती त्यामुळे शासनाने याची दखल घेऊन निवासी नायब तहसीलदार म्हणून डॉ आसमा मुजावर यांची या ठिकाणी बदली करून दिली नायब तहसीलदार डॉक्टर आसमा मुजावर या धडाकेबाज महिला अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे त्यांनी अवैध रेतीवर मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या आहेत त्यामुळे रेती माफियामध्ये त्यांची एक वेगळी दहशत आहे त्यांना आता निवासी नायब तहसीलदार दिल्यामुळे त्यांनी आपल्या पदाला न्याय देत आपल्या कामाला धडाकेबाज सुरुवात केली असून त्यांनी दोन दिवसांमध्येच तब्बल सहाशे पेक्षा जास्त विविध प्रकारचे दाखले प्रमाणपत्र निकाली काढले आहेत यामध्ये उत्पन्नात दाखले आदिवासी प्रमाणपत्र जातीचे प्रमाणपत्र नॉन क्रिमीलेअर आधी सह विविध दाखल्याचा समावेश आहे आतापर्यंत त्यांच्याकडे एकही पेंडींग दाखले नाहीत तात्काळ दाखले मिळाल्या मुळे विद्यार्थी शेतकरी आणि लाभार्थ्यांना मध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे

### दलालामार्फत कोणीही येऊ नये डॉ आसमा मुजावर

आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे दाखले ताबडतोब काढून देण्यात येत आहे त्यामुळे लाभार्थ्यांनी दलालामार्फत येऊ नये विशेष म्हणजे दवाखान्याच्या कामासाठी तात्काळ उत्पन्नाचे दाखले काढून देण्यात येतात काही अडचण असल्यास लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष भेटावे असे आवाहन देखील नायब तहसीलदार डॉक्टर असमा मुजावर यांनी केली आहे

# खरीप २०२४ साठी एक रुपयात पिक विमा योजना सीएससी चालकांना प्रती विमा अर्ज रु.१ पेक्षा जास्त रक्कम देऊ नये

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी: प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपया विमा हप्ता भरून सहभागी करून घेण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने २०२३ मध्ये घेतला आहे. गत वर्षी खरीप २०२३ मध्ये राज्यातील विक्रमी असे १ कोटी ७० लाख विमा अर्जाद्वारे शेतकऱ्यांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. खरीप २०२४ मध्ये ३० जून पर्यंत ४० लाख विमा अर्ज नोंद झाली आहे.

**विमा अर्ज बाबत महत्वाची माहिती.** प्रधानमंत्री पिक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांना प्रति विमा अर्ज रुपये एक प्रमाणे योजनेतील सहभाग शासनाने देऊ केला आहे. विमा योजनेमध्ये सहभागासाठी खालील पर्याय आहेत.

✻ शेतकरी स्वत: केंद्र सरकारचे विमा पोर्टल www.pmfby.gov.in वर ऑनलाईन अर्ज भरू शकतो. शेतकऱ्याचे ज्या बँकेमध्ये खाते आहे, त्या बँकेमध्ये जाऊन तो विमा अर्ज भरू शकतो. ✻ कर्जदार शेतकऱ्यांनी विमा मुदत संपायच्या किमान सात दिवस आधी विमा योजनेत सहभाग घ्यायचा असल्यावावत संबंधित वित्तीय संस्थेस कळविल्यास त्या संस्थेमार्फत त्याचा विमा हप्ता जमा करुन त्यांना सहभागी करुन घेण्यात येते. केंद्र सरकारने नियुक्त केलेले विमा प्रतिनिधी यांच्यामार्फत सहभाग घेऊ शकतो. ✻ सीएससी केंद्र चालकामार्फत अर्ज करता येऊ शकतो. ✻ सीएससी केंद्र चालकांना प्रति शेतकरी रुपये ४० प्रमाणे शुल्क केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. सदर शुल्क संबंधित विमा कंपनी ही सीएससी यांना अदा करणार आहे. याच्या व्यतिरिक्त अन्य शुल्क सीएससी चालक घेऊ शकत नाहीत. ✻ मात्र शेतकऱ्याने ७/१२, ८-अ स्वत: काढून दिला पाहिजे. किंवा शासकीय शुल्क भरून पश्रळपश प्राप्त करून घ्यावा. राज्यात काही ठिकाणी काही सीएससी केंद्र चालक हे शेतकऱ्याकडून प्रति अर्ज रुपये एक पेक्षा अधिक रक्कम घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत यावावत अशा प्रकारची घटना घडत असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृपी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृपी अधिकारी, जिल्हा सीएससी प्रमुख यांच्याकडे तक्रारी केल्यास त्याची दखल घेऊन कडक कारवाई केली जाईल.

योजनेत सहभागासाठी अंतीम मुदत दि. १५ जुलै, २०२४ आहे. ✻ योजनेच्या अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृपि रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७, संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृपि विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

असे आवाहन कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण कृषी आयुक्तालय, पुणे यांनी केले आहे

**विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे ?**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पिक कर्ज घेतलेल्या शेतक-यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्या साठी शेतक-याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे वावत लेखी कळविणे गरजेचे आहे. इतर विगर कर्जदार शेतक-याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोपणापत्र घेवून प्राधिकृत बँकेत किंवा कॉमन सर्विस सेंटर (CSC) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता.

# विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर होताच मुंडे समर्थकांचा भाजपा कार्यालयासमोर जल्लोष



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे: भारतीय जनता पक्षाकडून विधान परिषदेसाठी पाच नेत्यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. यात भाजपाच्या बीड लोकसभा मतदारसंघातून पराभूत झालेल्या नेत्या पंकजा मुंडे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर दिसत आहेत. भाजपने परिपत्रक काढत त्यांच्या नावाची घोषणा केली आहे.

पंकजाताई मुंडेंना भाजपाकडून विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर दुसरबीड येथे ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुनील कायंदे यांच्या समर्थकांकडून भाजपा कार्यालयासमोर फटाके फोडून जल्लोष करण्यात आला.

मुंडे समर्थकांनी एकत्र येत पंकजा मुंडे यांच्या नावाने घोषणाबाजी करत व फटाके फोडून हा आनंदोत्सव साजरा केला. यावेळी डॉ.दशरथ शिंदे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष ज्ञानबा मुंढे, डॉ.शिवाजी खरात, श्रीकृष्णा तौर,प्रा.पंडीत सानप, शिवराज कायंदे,भाजपा शहराध्यक्ष सुधाकर मुंढे, सरपंच गजानन मुंढे, सुरेश बुलकडे, विकास घुगे, गजानन घुगे,किशोर अण्णा, दत्ता घुगे, बंडू सांगळे,हभप प्रकाश पालवे,विशाल वाघ, ज्ञानेश्र्वर मुंढे, रत्नाकर डोईफोडे, सुंदरम आढाव, बाजीराव वाघ, बि.के.म्हस्के, शिवहरी सानप, रामेश्र्वर बुधवत, गजानन सोनुने,पि.पि.नागरे, जि.के.नागरे,उध्दव लांडगे, शिवाजी बुधवत, देवानंद नागरे, गणेश केवट रतन फुलरे प्रदीप सांगळे यांच्यासह डॉ.सुनील कायंदे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय राज्यमंत्री पदाची हॅट्रीक केल्याबद्दल रामदास आठवले यांचा उद्या नवी दिल्लीत सत्कार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचा भारत सरकार मध्ये तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल संपूर्ण देशातील रिपब्लिकन कार्यकर्त्यां मध्ये आणि दलित बहुजन जनते मध्ये आंनद उत्साह आहे.केंद्रिय राज्य मंत्री पदाची हॅट्रीक केल्याबद्दल ना.रामदास आठवले यांचा नवीदिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन येथे देशभरातील रिपब्लिकन कार्यकर्त्यंच्या वतीने उद्या मंगळवार दि.२ जुलै रोजी दुपारी ३ वाजता भव्य सत्कार करण्यात येणार आहे. रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारीणीची महत्वाची बैठक उद्या मंगळवार दि.२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय सेंटर नवी दिली येथे आयोजित करण्यात आली आहे.देशभरातील सामाजिक न्याय मंत्रालयाच्या योजनांचा आढावा आणि प्रात्यक्षिकसह माहिती देण्यात येणार आहे.या बैठकित रिपाइं चे देशभरातील राष्ट्रीय कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थीत राहणार आहेत.